पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०२

**सभावृत्तांत**

दिनांक – **०५/११/२०२०** वेळ - **दुपारी २.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०५/११/२०२०** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा.सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.बारसे प्रियांका प्रविण
४. मा.कामठे तुषार गजानन
५. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत
६. मा.भाऊसाहेब सोपान भोईर
७. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.महादू श्रीपती सस्ते, बो-हाडेवाडी शाळेमध्ये इ.९वी व १० वी चे वर्ग सुरु करणेबाबत. – मा.सारीका सस्ते , मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांना “शब्दवेद” पुस्तक थेट पध्दतीने खरेदी करण्याबाबत.- मा.सारीका सस्ते , मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश पी.टी.गणवेश व स्वेटर वाटप करण्याबाबत.- मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागात पर्यवेक्षक पदी नियमानुसार नियुक्ती करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिं.चिं.मनपाच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळेत रिक्त पदी पदोन्नतीनुसार मुख्याध्यापक पदाची नेमणूक करण्याबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.५ गवळीनगर भोसरी येथील प्राथमिक शाळेसाठी आरक्षित (आरक्षण क्र.४००) असलेल्या जागेवर मनपा प्राथमिक शाळा बांधण्याबाबत.- मा.प्रियांका बारसे , मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळा माळवाडी,पुनावळे क्र.१०१ शाळेच्या पहिल्या मजल्याचे वाढीव काम करुन आणखी चार वर्गखोल्याचे बांधकाम करुन घेणेबाबत.- मा.स्वाती काटे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळा निर्जंतुकीकरण (सॅनिटायझर) करुन घेणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) पिं.चिं.मनपाच्या डॉ.अल्लामा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी येथील शाळेमध्ये दोन शिफ्टमध्ये पुरुष सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत.- मा.स्वाती काटे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) पिं.चिं.मनपाची यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळा, थेरगाव ही शाळा आकांक्षा फौंडेशन हया संस्थेस चालविण्याकरीता देणेबाबत.- मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) पिं.चिं.मनपाच्या थेरगाव शाळेच्या मैदानाच्या शेजारील बाजूच्या जागेमध्ये बंदिस्त हॉल बांधून मिळणेबाबत.- मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२) शिक्षण मंडळाचे खरेदी व व्यवस्थापनबाबतचे यापूर्वीचे अधिकार कायमस्वरुपी पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण समितीस प्रदान करणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३) पिं.चिं.मनपाच्या प्राथमिक विद्यालयांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता ऑनलाईन व ऑफलाईन नाटय प्रशिक्षणातून संस्कारक्षम घटक रुजवणेबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१४) पिं.चिं.मनपा प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य खरेदी साहित्याचे नमुने शिक्षण समितीच्या मान्यतेकामी पाठविण्याबाबत.- मा.प्रियांका बारसे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१५) पिं.चिं.मनपाच्या पिंपळे निलख प्राथमिक शाळा क्र.५२ शाळेमध्ये इ.९ वी व १०वी चे वर्ग सुरु करणेबाबत. – मा.तुषार कामठे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

---------

**खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली**

सुचक – मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक – मा.स्वाती काटे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.शिक्षण समितीची गुरुवार दिनांक ५/११/२०२० रोजी होणारी पाक्षिक सभा(कार्यपत्रिका क्रमांक ०२) दिनांक ११/१२/२०२० रोजी सकाळी ११.००वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती –** सदर सभा ही शुक्रवार दि.११/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०२

**सभावृत्तांत**

( ०५/११/२०२० ची तहकूब सभा )

दिनांक – ११/१२/२०२० वेळ – सकाळी ११.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक ०५/११/२०२० ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ११/१२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा.सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.बारसे प्रियांका प्रविण
४. मा.कामठे तुषार गजानन
५. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत
६. मा.भाऊसाहेब सोपान भोईर
७. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक २३/१०/२०२० रोजी झालेल्या (विशेष सभेचा) **(कार्यपत्रिका क्रमांक ०१)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता

तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे.त्याच अनुषंगाने सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.महादू श्रीपती सस्ते, बोऱ्हाडेवाडी शाळेमध्ये इ. ८ वी पर्यंत मुलींसाठी वर्ग चालू आहे. सदर परिसरामध्ये पुढील इ.९ वी व १० वी चे शिक्षणासाठी सोय नसल्याने त्यांना इतरत्र शाळेत प्रवेशासाठी जावे लागत आहे. तसेच सदर विद्यार्थी हे बहुतांशी गरीब कुटुंबातील असल्याने पर्यायाने त्यांची शिक्षणाची गैरसोय होत आहे. त्यामुळे सदर परिसरातील विद्यार्थांची शैक्षणिक गैरसोय होऊ नये व कोणत्याही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होऊ नये याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.महादू श्रीपती सस्ते, बो-हाडेवाडी शाळेमध्ये इ.९ वी व १० वी चे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहत ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. तसेच विद्यार्थांबरोबर शिक्षकांचा ही अद्यावत वाचनाची माहिती मिळावी. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांना “शब्दवेद” पुस्तक शिक्षकांसाठी वाचनासाठी व विद्यार्थांना शिक्षणासाठी प्रेरणा देणारे आहे. तरी मे.महाजन ब्रदर्स यांचेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांसाठी “शब्दवेद” हे पुस्तक सन २०२१-२२ साठी थेट पद्धतीने खरेदी करणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास् मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहत ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

महापालिका शाळेतील विध्यार्थ्यांना या वर्षी दिवाळी झाली गणवेश पि टी गणवेश नाही थंडी चालू झाली पण विध्यार्थ्यांना स्वेटर नाही इतक्या वर्षात पहिल्यांदाच विध्यार्थ्यांना

सदर साहित्यापासून वंचित ठेवण्याचे काम प्रशासना मार्फत सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरोधात हाय कोर्टात जाणून बुजून जाऊन शहरातील गोरगरीब विद्यार्थ्यांवर अन्याय केला जात आहे सदर साहित्य तयार असून प्रशासनाने ज्या प्रमाणे दरमहा विध्यार्थ्यांना अन्न धान्य शाळेतून वाटप केले जाते त्यानुसार त्वरित शालेय गणवेश पि टि गणवेश व स्वेटर वाटप करणेस तसेच विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये. याची सर्वोतोपरी काळजी घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारीका सस्ते

संदर्भ :मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागात पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील मनपा व खाजगी शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच विभागातील शालेय संबंधित कामकाज सुरळीतपणे पार पडण्यासाठी पर्यवेक्षक पदाची नियुक्ती करण्यात येते. सदर पर्यवेक्षकांची नियुक्ती करताना सेवाजेष्ठता तसेच सेवानियमानुसार असे निकष तपासून केली जाते. सद्यस्थितीत प्राथमिक शिक्षण विभागात नियुक्त केलेले पर्यवेक्षकांची नेमणूक ही कोणतीही सेवाजेष्ठता अथवा सेवानियामानुसार केली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागात पर्यवेक्षक पदाची सेवाजेष्ठता तसेच सेवानियमानुसार नियुक्ती करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारीका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत अंदाजे ४० ते ४२ शाळांमध्ये मुख्याधापक पदाच्या जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे. मुख्याध्यापक पद रिक्त असल्याने त्याचा शाळेतील कामकाजावर परिणाम होत आहे. शाळांवर कोणाचेही नियंत्रण नसल्याने शाळा व्यवस्थापन व पालकांमध्ये सुसंवाद राहिलेला नाही, हया संदर्भात अनेक पालकांच्या तक्रारी कार्यालयास प्राप्त होत आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळेत रिक्त पदी पदोन्नतीनुसार मुख्याध्यापक पदाची नेमणूक करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारीका सस्ते

संदर्भ :मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रभाग क्र. ५ गवळीनगर भोसरी येथील प्राथमिक शाळेसाठी आरक्षित (आरक्षण क्र. ४००) असलेल्या जागेवर नव्याने मनपा प्राथमिक शाळा बांधण्यात यावी. प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या जागेचा ८०% ताबाही मिळालेला आहे.सदर परिसरात अनेक विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे.एकही विद्यार्थी हा शिक्षणापासून वंचित राहता कामा नये यासाठी शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे.तसेच हया आरक्षित जागेवर मनपा प्राथमिक शाळा सुरु झाल्यास पुणे-नाशिक रोड लगतच्या प्रभाग क्र. ५,६,७ व दिघी परिसरातील अत्यंत गोरगरीब होतकरू विद्यार्थांना मनपा प्राथमिक शाळेत शिक्षण घेता येईल. तरी प्रभाग क्र. ५ गवळीनगर भोसरी येथील प्राथमिक शाळेसाठी आरक्षित (आरक्षण क्र.४००) असलेल्या जागेवर मनपा प्राथमिक शाळा तात्काळ बांधणेकामीची प्रशासकीय कार्यवाही करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक - ०७

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.स्वाती काटे अनुमोदक : मा.सारीका सस्ते

संदर्भ : मा.स्वाती काटे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माळवाडी पुनावळे क्र.१०१ प्राथमिक शाळेमध्ये इ. १ ते इ. ४ थी पर्यंत शाळा भरते. सदर शाळेमध्ये ४ वर्ग खोल्या आहेत.सदर शाळेची पटसंख्या वाढल्याने पुढील शैक्षणिक वर्षापासून इ. ५ वी चा वर्ग सुरु करणे प्रस्तावित असल्याने विद्यार्थांना बसण्यासाठी चार वर्ग खोल्या पुरेशा नाहीत. तसेच शाळेच्या इमारतीमध्ये मुख्याध्यापक कार्यालय, ग्रंथालय, प्रयोगशाळा यांची वर्ग खोल्या नसल्याने सोय नाही. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळा माळवाडी, पुनावळे क्र.१०१ शाळेच्या पहिल्या मजल्याचे वाढीव काम करून आणखी चार वर्गखोल्याचे बांधकाम तात्काळ करून घेणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०९ विषय क्रमांक - ०८

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

भारतामध्ये सर्वत्र Covid-19 या संसर्गजन्य रोगाची साथ चालू असल्याने गेली काही महिने लॉकडाऊन असल्याने सर्व शाळा बंद होत्या. सद्यस्थितीत राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार शाळा सुरु होण्याचे संकेत दिलेले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. तसेच विद्यार्थांच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. राज्य शासनाच्या धोरणानुसार शाळा सुरु झाल्यानंतर शाळेत येणा-या विद्यार्थांच्या कोरोना रोगाचा प्रादुर्भाव हा पूर्णपणे संपलेला नसल्याने आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे असणार आहे. तरी विद्यार्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळा निर्जंतुकीकरण (सॅनिटायझर) करून घेणेस तसेच होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक - ०९

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.स्वाती काटे अनुमोदक : मा.सारीका सस्ते

संदर्भ :मा.स्वाती काटे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या डॉ.अल्लामा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा, कासारवाडी शाळेमध्ये सद्यस्थिती महिला सुरक्षा रक्षक नेमलेला आहे. महिला सुरक्षा रक्षक हया सकाळी ७ वा. पासून ते दु. २ वा. पर्यंत असतात. त्यानंतर शाळेमध्ये एकही सुरक्षा रक्षक नसतो.शाळेसमोर मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. शाळेचे मैदान खूप मोठे असल्याने त्या ठिकाणी अनेक तरुण हे संध्याकाळी व रात्रीच्या वेळी मद्यपान करीत असतात. शाळेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान ही हया तरुणाकडून होत आहे. सदर बाबतीत अनेकदा परिसरातील नागरिकांना हया गोष्टीचा त्रास होत असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधीस कळविले आहे. महिला सुरक्षा रक्षक ह्यांना हे तरुण जुमानतही नाही. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या डॉ. अल्लामा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा, कासारवाडी येथील शाळेमध्ये दोन शिफ्टमध्ये पुरुष सुरक्षा रक्षक नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - १०

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच धर्तीवर आपल्या पाच मनपा प्राथमिक शाळा हया आकांक्षा फौंडेशन या संस्थेस चालविण्याकरिता दिल्या आहेत. सदर संस्थेस दिलेल्या शाळा हया अतिशय यशस्वीपणे त्यांनी चालविल्या आहेत.सदर शाळेमध्ये प्रवेश मिळण्याकरिता पालकांमध्ये स्पर्धा होत आहेत.शाळेचा पट ही खूप वाढला आहे. सदर संस्थेमार्फत विद्यार्थांना उत्तम प्रकारचे शिक्षण मिळत आहेत. सदर संस्थेमध्ये शिक्षण घेतलेले विद्यार्थी स्पर्धा परीक्षेतही उत्कृष्ट कामगिरी करीत आहेत. अशाच प्रकारचे शिक्षण थेरगाव परिसरातील विद्यार्थांना मिळण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळा, थेरगाव ही शाळा आकांक्षा फौंडेशन हया संस्थेस चालविण्यास देणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - ११

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.सारीका सस्ते अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव शाळेमध्ये अनेक विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत यामधील निवडक खेळाडूंचा शाळेच्या नवीन तयार केलेल्या मैदानांवर विविध खेळांचा नियमितपणे सराव चालू असतो.त्यामुळे शाळेतील विद्यार्थी जिल्हा,विभाग,राज्य,राष्ट्रीय पातळीवर मनपाचा नावलौकिक वाढवत आहेत. कबड्डीमध्ये शाळेतील मुलीनी राज्यात सुवर्णपदकासह प्रथम क्रमांक मिळवून नेत्रदीपक यश मिळविले आहे. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील कबड्डी स्पर्धा या केवळ मॅटवर होतात.शाळेत राष्ट्रीय पातळीवर खेळणारे खेळाडू नियमितपणे सराव करत आहेत.सदर शाळेस स्वत:ची मॅटही मिळाली आहे. तथापि स्वतः:ची मॅट असूनही केवळ बसविण्याकरिता पुरेसा बंदिस्त हॉल नसल्याकारणाने मॅटचा नियमित वापर करण्यात येत नाही. त्यामुळे खेळाडूमध्ये वरिष्ठ पातळीवरील क्रीडा कौशल्य विकासित होण्यास मर्यादा येत आहेत. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव शाळेच्या मैदानाच्या शेजारील बाजूच्या जागेमध्ये बंदिस्त हॉल बांधणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - १२

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

दिनांक २ जुलै २०१७ या वर्षी शिक्षण मंडळाचे अधिकार संपुष्टात येऊन शिक्षण मंडळाची कार्यप्रणाली महानगरपालिकेकडे प्रदान करण्यात आली असून सदर शिक्षण मंडळाचे खरेदीचे सर्व अधिकार मनपाच्या भांडार विभागाकडे सोपविण्यात आले आहेत. त्यानुसार शिक्षण समितीकडे व सभापती, शिक्षण समिती यांचेकडे फक्त व्यवस्थापन अधिकार आहेत.परंतु त्यानुसार विद्यार्थांना शिक्षणाबाबतीत व त्यांना शिक्षण मंडळामार्फत उपलब्ध होणा-या सोयीबाबत अनेक प्रमाणात विद्यार्थांच्या गैरसोयीचे होत आहेत. याबाबत पालकांच्या अनेक तक्रारी शिक्षण समितीकडे येत आहेत. तसेच यापूर्वी शिक्षण मंडळाकडे असणारी सर्व कार्यवाही अथवा खरेदी प्रणाली शिक्षण समितीकडे उपलब्ध आहे तसेच शिक्षण मंडळाच्या खरेदी समितीत भांडार अधिकारी यांचाही समावेश असायचा. त्यानुसार शिक्षण मंडळाची खरेदी प्रक्रिया निविदेच्या माध्यमातून राबविली जात होती. त्यानुसार सदर शिक्षण समितीत यापूर्वी निविदा प्रक्रिया राबविताना असलेली शिक्षण समिती यामध्ये अतिरिक्त आयुक्त, भांडार सह आयुक्त, प्रशासन अधिकारी तसेच शिक्षण समिती सभापती यांची समिती गठीत करून निविदा प्रक्रिया भांडार विभागामार्फत न राबविता शिक्षण समितीच्या माध्यमातून राबविण्यात यावी. त्यानुसार विद्यार्थी कोणत्याही महानगरपालिका माध्यमातून मिळणा-या सुविधा पासून विद्यार्थी वंचित राहणार नाही व त्यांना सर्व सोयीसुविधा वेळेत त्वरित मिळतील.तसेच यापूर्वी शिक्षण मंडळाचे वार्षिक बजेट ( अंदाजपत्रक) एकदाच आर्थिक मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे जात होते. परंतु आता वेळोवेळी खरेदीचे विषयपत्र मा.स्थायी समितीकडे पाठवून मा.स्थायी समितीचा बहुमुल्य वेळ वाया घालवणे योग्य होणार नसून सदर याकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक - १३

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.सारीका सस्ते

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी-चिंचवड शहरात 'थिएटर वर्कशॉप कंपनी' या संस्थेच्या माध्यमातून नाट्य चळवळीतून नाट्याभ्यासातून शालेय शिक्षणास सहकार्य, संस्कार वर्गासह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता अनेक विधायक उपक्रम राबवत आहेत. सदर संस्थेच्या माध्यमातून काही शैक्षणिक संस्था, शाळांची तपासणी केली असता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की आत्ता उभरत्या पिढीला भविष्यातील उत्तम नागरिक म्हणून आपलं आयुष्य व्यतीत करण्यासाठी उत्तम शिक्षणा बरोबरच लोप पावत चाललेल्या मुल्यशिक्षणाचे अनेक पैलू त्यांना आत्मसात होणं गरजेचं आहे. आजच्या अतिशय वेगवान जीवन संस्कृतीला खुप कमी वेळात आपलंस करण्याच्या मोहात आजचा युवक अनेकदा वाम मार्गाला जातोय. याच सर्व गोष्टींचा विचार करुन सदर संस्था

मुलांच्या लहान वयातच त्यांना निसर्गरचना, नातेसंबंध, संस्कार, साहित्य, कला, या घटकांच्या माध्यमातूनच नाट्यप्रशिक्षण घेणार आहे. या नव्या वाढत्या पिढीतील उत्तम समज, सहनशिलता, त्याग, निस्वार्थ भाव हरवून तिथं, आक्रस्ताळेपणा, न्यूनगंड, जगण्याची उपरोधात्मक स्पर्धा वा तुलनात्मक आयुष्य येते आणि त्यामुळे त्यांचा लहान लहान गोष्टीतील आनंद नाहीसा होत चालला आहे तेच थोपवण्याचा प्रयत्न सदर संस्था माध्यमातून करणार आहे. नेमक्या याच गोष्टींचा अंदाज घेवून सदर संस्था महानगरपालिकेच्या १८ माध्यामिक विद्यालयांमधून पहिल्या टप्प्यात ५ प्राथमिक विद्यालये आणि या प्रत्येक विद्यालयातून प्रत्येकी २५ विद्यार्थ्यांची निवड केली होती. आणि त्या विद्यार्थ्यांना वरील पद्धतीचा अभ्यास आम्ही १६ डिसेंबर २०१९ ते १८ फेब्रुवारी २०२० या दोन महिन्यांच्या कालावधीत यशस्वीरित्या राबवला देखील आहे. हा नविन उपक्रम विद्यार्थी, पालक आणि शिक्षकवृंद यांना देखील उपयुक्त आहे. थोडक्यात हा उपक्रम सध्याच्या कोरोना महामारीच्या परिस्थितीतील मुलांमधील आरोग्यविषयक जनजागृती, त्यांचे खचलेले मनोबल वाढवण्याबरोबर त्यांच्या सामाजिक, भावनिक, वैचारिक संक्रमण करणे हाही अजून एक उद्देश साध्य करता येईल. हा उपक्रम विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्या हिताचा असल्याचे जाणवले आहे, शिवाय मुलांच्या दैनंदिन हजेरीपटावर, त्यांच्या वागणूकीवर याचा चांगला प्रभावही जाणवतो. तरी सकारात्मक मुल्य आणि विचारांच्या जडणघडणीच्या या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आपण सकारात्मक निर्णय घेवून प्राथमिक विद्यालयांतील मुलांच्या उज्ज्वल आणि निकोप भवितव्यासाठी प्रयत्न करावेत साधारणतः सुरुवातीला किमान २ महिन्यांचा कालावधी असणारा हा उपक्रम विचारविनिमयातून ठरवून दिलेल्या कालावधीमध्येच होईल. या उपक्रमासाठी सध्या सुरु असलेल्या कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यालये सुरु न झाल्यास पैस रंगमंचावरुन थेट ऑनलाईन पद्धतीनेही वर्ग घेतले जातील. अथवा विद्यालये सुरु झाल्यास विद्यालयातच सर्व प्रकारची खबरदारी घेवूनच संबंधित वर्ग घेतले जातील. शिवाय संबंधीत शिक्षकांशी चर्चा करुन दैनंदिन वेळापत्रक, नियमित परिक्षा, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन आठवडयातून केवळ ३ दिवस प्रत्येकी १ तास अशा स्वरुपात अभ्यासवर्ग घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - १४

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.प्रियांका बारसे अनुमोदक : मा.स्वाती काटे

संदर्भ : मा.प्रियांका बारसे, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्य मोफत वाटप करणेकामी कार्यवाही करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही ही मध्यवर्ती भांडार विभागामार्फत निविदा कार्यवाही राबविण्यात येऊन करण्यात येत आहे. मध्यवर्ती भांडार विभागामार्फत यापूर्वी दरपत्रक व शैक्षणिक साहित्याचे नमुने मागणी करण्यात आलेले आहे. तरी प्राप्त झालेले शैक्षणिक साहित्याचे नमुने शिक्षण समितीचे मान्यतेकामी पाठविण्यात यावे त्यानंतरच शैक्षणिक साहित्य निविदा कार्यवाही

राबविणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक - १५

दिनांक - ११/१२/२०२०

सुचक : मा.तुषार कामठे अनुमोदक : मा.सारीका सस्ते

संदर्भ : मा.तुषार कामठे, मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे.त्याच सदर परिसरामध्ये पुढील इ.९ वी व १० वी चे शिक्षणासाठी सोय नसल्याने त्यांना इतरत्र शाळेत प्रवेशासाठी जावे लागत आहे. तसेच सदर विद्यार्थी हे बहुतांशी गरीब कुटुंबातील असल्याने पर्यायाने त्यांची शिक्षणाची गैरसोय होत आहे. त्यामुळे सदर परिसरातील विद्यार्थांचीशैक्षणिक गैरसोय होऊ नये व कोणत्याही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होऊ नये याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे निलख प्राथमिक शाळा क्र.५२ शाळेमध्ये इ.९ वी व १० वी चे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
सभापती
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३८१/२०२०
दिनांक : १७/१२/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना